# निशाणी क्र. ४४ वरील आदेश

वादींनी प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ६, नियम ७ प्रमाणे वादपत्रात दुरूस्ती करून अर्जात नमुद केलेल्या पक्षकारांना वादीं व प्रतिवादीं म्हणून समाविष्ट करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादींनी असे नमुद केले आहे की, प्रस्तूत दावा मौजे लिहा येथील गट क्र. २६८ क्षेत्रफळ ६ हेक्टर १९ आर पोटखराब ३ आर पैकी मयत रंगूबाई हिच्या नावे असलेल्या वडिलोपार्जीत जमीन ४ हेक्टर ७८ आर ची वाटणी करून स्वतंत्र ताबा मिळणे करिता केलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ७ हरणाबाई व वादी क्र. ५ प्रकाश यांचा मृत्यू झालेला आहे, करिता दाव्यामध्ये त्यांच्या वारसांना समाविष्ट करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. करिता वादींचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०३. प्रस्तूत अर्जास प्रतिवादींनी लेखी आक्षेप नोंदविला व त्यात नमूद केले की, मयत प्रतिवादी क्र. ७ ही वादींची बहिण तसेच वादी क्र. ५ हे वादींचे भााउ आहे. त्यामुळे त्यांच्या मृत्यूबाबत माहिती नव्हती असा खोटा बनाव अर्जदारांनी केला आहे. करिता प्रस्तूतचा अर्ज बेकायदेशीर असल्यामुळे नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रस्तूतचा अर्ज त्यावरील लेखी म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांच्या विव्दान वकिलांचा युक्तीवाद ऐकला असता, माझे समक्ष पुढील प्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यावर मी कारण मिमांसेसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीं हे प्रस्तूत अर्जातील मागणी प्रमाणे दावा दुरूस्ती करून मिळण्यास पात्र आहेत का ? | होय |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर |

## कारणमिमांसा

०५. प्रस्तूत दावा हा वादींनी प्रतिवादीं विरूध्द मौजे लिहा येथील वाद जमीनीची वाटणी करून प्रत्यक्ष ताबा मिळविण्याकरिता दाखल केलेला आहे. परंतू प्रतिवादी क्र. ७ हरणाबाई व वादी क्र. ५ प्रकाश यांचा मृत्यू झालेला आहे. करिता दाव्यात त्यांचे वारस हे अभिलेखावर आणणे हे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. सदर प्रतिवादी क्र. ७ हरणाबाई हिचा मृत्यू दिनांक २०.०४.२०१३ रोजी व वादी क्र. ५ प्रकाश यांचा मृत्यू दिनांक १६.०८.२०१६ रोजी झालेला आहे व वादींनी त्यांचे अर्जात नमूद केलेले वारस हे प्रतिवादी व वादी म्हणून समाविष्ट करण्याची मागणी केली आहे. परंतू त्यास मयत प्रतिवादी क्र. ७ व वादी क्र. ५ हे वादींचे बहिण भाउ आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या मृत्यूची तसेच त्यांचे वारस कोण या बाबत माहिती नव्हती असे म्हणणे खोटे आहे असे म्हणून लेखी आक्षेप नोंदविला.

०६. प्रस्तूत दाव्याचे स्वरूप विचारात घेतले असता दावा हा वाद मालमत्तेचा स्वंतत्र ताबा मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. तसेच मयत वादी व प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर आणणे हे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे आणि तसे केले असता मुळ दाव्याच्या स्वरूपात कुठलाही बदल होणार नाही व प्रतिवादींचे कुठलेही नुकसान होणार नाही. करिता वरिल सर्व बाबींचा विचार केला असता नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीने दाव्यातील गुंतागुंत व दाव्याची संख्या वाढू नये तसेच सदर दाव्यातील सर्व वाद मुद्दे गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. करिता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर हे होकारार्थी नोंदविते व मुद्दा क्र. २ साठी खालील आदेश पारित करते.

# आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश १ नियम १०(२) तसेच आदेश ६ नियम १७ नुसार रक्कम रूपये १०००/— खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. खर्चाची रक्कम रूपये १०००/— आदेशाच्या निकालापासून १४ दिवसाच्या आत हे अर्जदारांनी प्रतिवादींना दिल्याची पुरसिसव्दारे न्यायालयास कळवावे व त्या पुरसिसवर प्रतिवादींची स्वाक्षरी व त्यांच्या विधीज्ञांच्या समक्ष म्हणून स्वाक्षरी असणे गरजेचे आहे.

३. वादींनी सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरूस्ती करून प्रतिवादी क्र. ७ व वादी क्र. ५ यांच्या वारसांना पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याचा आदेश झाल्याच्या १४ दिवसाच्या आत दुरूस्ती करावी.

४. वादी यांनी आदेशात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरूस्ती करून त्याची सुधारीत प्रत आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत दाखल करावी

स्वाक्षरित/—

(कु.एस. एस. बजाज)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर
भोकरदन.

दिनांक : ०८.०६.२०२०.

Shital Shriram Bajaj

Digitally signed by Shital Shriram Bajaj
Date: 2020.06.09 12:15:25 +0530

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी. डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : यु. आर. दसरे
न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी. डी. एफ. दिनांक : ०९.०६.२०२०

स्वाक्षरित/—
लघुलेखकाची सही